महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत विधि व न्याय विभागाच्या अधिपत्याखालील निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयामार्फ़त पुरविण्यात येणा-या सेवांचे शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-११२६/(प्र.क्र.३१४/२६)का-१७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २६ नोव्हेंबर, २०२६.

संदर्भ :-१) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १७२५/प्र.क्र.१२६/मातं, दि.३०.०५.२०२५.

३) नियोजन विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४७/का.१४११, दि.०३.०८.२०२६.

४) निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक निभासं-५७/GPR/(३३/२३)/कार्या-२/१८०अ, दिनांक २५.०५.२०२६

५) मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षते खाली पार पडलेल्या दि.१९.११.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना-

मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार संदर्भ क्र. २ अन्वये निर्गमित शासन परिपत्रकान्वये १५० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला होता. त्यामध्ये ई-प्रशासन सुधारणा उपक्रम चांगल्या प्रकारे अंमलात आणण्यासाठी शासनाच्या विविध सेवाअधिक पारदर्शक, सुलभ, कालबद्ध, नागरिकाभिमुख व पूर्णतः डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी "शासन प्रक्रिया पुनर्रचना" (Governance Process Re-engineering - GPR) राबविण्याबाबत सर्व विभागांना निर्देश देण्यात आले आहेत.

त्यानुषंगाने, राज्यातील लोकाभिमुख सेवा व कल्याणकारी योजना अधिक सुलभ, पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने तंत्रज्ञानाचा वापर करून, विद्यमान कार्यपध्दतीची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. राज्यात वेगवान औद्योगिकीकरण आणि मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांचा विकास होत असल्यामुळे भागीदारी संस्थेची नोंदणी व घटनेतील बदलांच्या नोंदणी बाबत एक तडजोडविरहित, आधुनिक आणि जलद पडताळणी प्रणाली असणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांना शासकीय सेवा उपलब्ध करुन देतांना, त्या सेवा अधिक सुलभतेने उपलब्ध करुन देण्याकरिता शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering-GPR) राबविण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने, निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र मुंबई यांच्या अंतर्गत देण्यात येणाऱ्या सेवांकरिता आवश्यक असणारा अर्जाचा नमुना, अनिवार्य असणारी किमान कागदपत्रे, सुधारित डिजिटल कार्यप्रवाह, मंजुरीचे स्तर, सेवा वितरणाचा कालावधी कमी करण्यासाठी आणि प्रमाणपत्राचा नमुना पडताळणीसाठी अभ्यासगटाची (Study Group) स्थापना करण्यात आली होती. त्यानुसार, सदर अभ्यासगटाने सादर

केलेल्या शिफारशी व सुधारणा या नियोजन विभागाच्या वाचा क्र.३ येथील दि.०३.०८.२०२६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने लोकाभिमुख सेवा व योजनांसाठी शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering GPR) मंजुरी व जलद अंमलबजावणीसाठी संस्थात्मक कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) मान्यता समितीसमोर दि.१९.११.२०२६रोजी निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र मुंबई या विभागामार्फत सादर करण्यात आल्या होत्या. सदर समितीने या विभागाच्या अंतर्गत देण्यात येणाऱ्या सेवांच्या शासकीय प्रक्रियापुनर्रचनेस (GPR) मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने, वाचा क्र.४ येथील दि.१९.११.२०२६ रोजीच्या इतिवृत्तास मा. मुख्य सचिव महोदयांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

भारतीय भागीदारी कायदा १९३२, कलम ५८ नुसार भागीदारी संस्था नोंदणी करता येते. सदर सेवा ROF पोर्टल, आपले सरकार पोर्टल व मैत्री पोर्टलद्वारे सद्यस्थितीत ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून देण्यात आली असून, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित केलेली आहे.

त्यानुषंगाने, राज्याच्या व्यवसाय सुलभता (EoDB) चौकटीला अधिक बळकटी देण्यासाठी भागीदारी संस्थांची नोंद करणे व तद्नंतर त्यात होणारे बदल नोंद करणे या सेवेच्या विद्यमान प्रकियेतील त्रुटी शासकीय प्रक्रिया पुर्नरचनेच्या (GPR) माध्यमातून दूर करून एकसमान कालबद्धप्रणाली आधारित सेवा वितरण व्यवस्था निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering-GPR) अंतर्गत निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई या विभागाच्या अधिनस्त कार्यालयांमध्ये देण्यांत येणाऱ्या सेवेची कार्यपध्दती सुलभ करणे प्रशासकीय कार्यक्षमता वाढविणे आाणि सेवापारदर्शक व कालबद्धपद्धतीने उपलब्ध करुन देणे या उद्देशाकरिता खालीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे.

०१. सेवेचे नाव, संक्षिप्त वर्णन, पात्रता निकष खालीलप्रमाणे:-

सेवेचे नावः -भारतीय भागीदारी कायदा, १९३२ च्या कलम ५८ नुसार भागीदारी संस्थांची नोंदणी.

संक्षिप्त वर्णनः -या विभागात भारतीय भागीदारी कायदा १९३२ च्या कलम ५८ नुसार भागीदारी संस्थांची नोंदणी केली जाते.

पात्रता निकषः-कोणतीही भागीदारी संस्था.

०२. शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) अंतर्गत सुधारित कार्यपद्धतीः-

भागीदारी संस्थेच्या नोंदणीस व सदर भागीदारी संस्थेच्या घटनेतील बदलास या सेवेची शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) अंतर्गत पुनर्रचना करण्यात आली असून, यामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत:-

अर्जातील रकाने कमी करणेः शासकीय प्रक्रियापुनर्रचने पुर्वी (Pre-GPR) अर्जातील रकान्यांची संख्या ७२ इतकी होती. सदर रकान्यांची संख्या शासकीय प्रक्रियापुनर्रचनेनंतर (Post-GPR) ४६ इतकी कमी करण्यात आली आहे. सदर ४८ रकान्यांपैकी ३८ रकान्यांतील माहिती स्वयंचलित प्रणालीद्वारे (Auto-fill/ Auto-fetch) उपलब्ध होईल.

०३. शासकीय प्रक्रिया पुनर्रचनेनंतर (Post-GPR) सेवेकरिता अर्ज करण्याची सुधारीत प्रक्रिया :-

शासकीय प्रक्रिया पुनर्रचनेनंतर (Post-GPR) सदर सेवेकरिता अर्जदाराने करावयाचा अर्ज या विभागाचे पोर्टल (rof.mahaonline.gov.in)/ आपले सरकार पोर्टल (aaplesarkar.mahaonline.gov.in)/ मैत्री पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. याकरिता अर्जदार स्वतः ऑनलाईन पद्धतीने अर्ज करू शकतात किंवा ते रहिवास करीत असलेल्या परिसरातील आपले सरकार सेवा केंद्राद्वारे ऑनलाईन अर्ज करू शकतात. अर्जदाराने अर्ज करतांना आपले सरकार नागरिक प्रोफाईल किंवा महाआयडी (MahaID) द्वारे लॉग इन करणे आवश्यक आहे.

३.१. अर्जाच्या नमुन्यात खालील बाबींचा समावेश असेलः

भारतीय भागीदारी कायदा, १९३२ चे कलम ५८ नुसार खालील बाबी:

(१) भागीदारी संस्थेचे नाव, भागीदारी संस्थेचा पॅन व ई-मेलपत्ता,

(२) भागीदारी संस्थेच्या धंद्याचे स्वरुप,

(३) भागीदारी संस्थेच्या धंद्याची जागा किंवा मुख्य जागा

(४) भागीदारी संस्थेचा जेथे धंदा चालवत असेल अशा अन्य कोणत्याही जागांची नावे

(५) प्रत्येक भागीदारी संस्थे मध्ये सामील झाल्याचा दिनांक

(६) सर्व भागीदारांची संपूर्ण नावे व कायमचे पत्ते, ई-मेलपत्ते आणि भ्रमणध्वनी क्रमांक,

(७) भागीदारी संस्थेचा कालावधी

या रकान्यांतील माहिती स्वयंचलित प्रणालीद्वारे आधार व पॅनवरुन(Auto-fill/ Auto-fetch) उपलब्ध होईल.

३.२. अर्जासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणेः

भागीदारी संस्थेच्या नोंदणी अर्जासोबत GPR पूर्वी ९ कागदपत्रे दाखल करणे गरजेचे होते. GPR नंतर ६ कागदपत्रे दाखल करणे गरजेचे आहे.

(१) सर्व भागीदारांच्या डिजिटल स्वाक्षरी केलेला अर्ज

(२) रु. १०/- चा कोरा मुद्रांक कागद

(३) भागीदारी पत्राची सीए अथवा व कीलांनी प्रमाणित केलेली प्रत.

(४) कंपनी भागीदार असल्यास मेमोरॅंडम ऑफ असोसिएशनची प्रमाणित प्रत

(५) NRI भागीदाराचे ओळखीसाठी पासपोर्ट अथवा NRI कार्ड

(६) प्राधिकृत व्यक्तीचे डिजिटल स्वाक्षरीचे प्राधिकारपत्र

भागीदारी पत्राची प्रमाणित प्रत (नोटरी/वकील/सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेली) कोरा मुद्रांक, प्राधिकारपत्र, इ.

३.३. अर्जासोबत आकारण्यात येणारे शुल्कः शासनाने वेळोवेळी निर्धारीत केल्यानुसार आपले सरकार सेवा पोर्टल/मैत्री पोर्टल याद्वारे अर्ज करण्यासाठी आवश्यक असलेले सेवा शुल्क अर्जासोबत भरणे आवश्यक असेल.

३.४. शुल्क व भरणा पध्दतीः सदर सेवेकरिता अर्जदारास आपले सरकार सेवा पोर्टल / मैत्री पोर्टलवर ऑनलाईन शुल्क भरणा प्रणाली (पेमेंट गेटवे) द्वारे शुल्क भरणा करणे आवश्यक असेल.

३.५. अर्ज छाननीची पध्दती : अर्जावर पुढील दोन टप्प्यांत पडताळणी करून त्रुटी नसल्यास अथवा त्रुटी पुर्ततेनंतर मंजुरी दिली जाईल. मंजूरीकार्यासन GPR पूर्वी ३ होते व GPR नंतर २ करण्यात आले आहे.

०४. सेवा वितरणाची कालमर्यादाः महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित केल्याप्रमाणे अर्जदाराने भागीदारी संस्थेच्या नोंदणीस मंजुरी देणे ही सेवाशासकीय प्रक्रिया पुनर्रचनेपुर्वी (Pre-GPR) सर्व आक्षेपांची पूर्तता केल्यानंतर ६० दिवसांच्या कालमर्यादेत देण्यात येत होती. शासकीय प्रक्रिया पुनर्रचनेनंतर (Post-GPR) सदरची सेवा सर्व त्रुटी पूर्तता केल्याच्या दिनांकानंतर ७ दिवसांच्या कालमर्यादेत मंजुरी देण्यातयेईल. म्हणजेच अर्जदाराने त्रुटी दूर करण्यासाठी घेतलेला कालावधी हा सदर कालावधी मोजतांना वगळण्यात येईल.

०५. नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना व वैधताः नोंदणी क्रमांक, नोंदणी झाल्याचा दिनांक, प्रमाणपत्र जारी करणाऱ्या प्राधिकाऱ्याचे पदनाम व डिजिटल स्वाक्षरी, तसेच ज्याद्वारे मंजुरी प्रमाणपत्राची ऑनलाईन पडताळणी करता येईल अशा कोडचा समावेश असेल. सदर मंजुरी प्रमाणपत्र आपले सरकार/मैत्री पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून दिले जाईल. सदर नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या दिनांकापासु नभागीदारी संस्था विसर्जित होईपर्यंतच्या कालावधीसाठी वैध राहील.

०६. अपील व तक्रार निवारणः अर्जदाराचा अर्ज फेटाळल्यामुळे किंवा अधिसूचित कालावधीत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे बाधित झालेला कोणताही अर्जदार, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या तरतुदींनुसार या सेवेसाठी नियुक्त केलेल्या प्रथम अपील अधिकाऱ्यांकडे पहिले अपील आणि त्यानंतर द्वितीय अपील प्राधिकाऱ्यांकडे दुसरे अपील दाखल करू शकतो. तद्नंतर, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाकडे दाद मागू शकतो. अर्जदाराचा अर्ज फेटाळतांना अर्ज फेटाळण्याची कारणे नोंदवणे आवश्यक आहे.

सदर सेवेबाबतची कोणतीही तक्रार आपले सरकार पोर्टलच्या तक्रार निवारण कक्षाद्वारे (Grievance Module) देखील सादर केली जाऊ शकते. सदर सेवेसाठी नोडल अधिकारी म्हणून उपनिबंधक भागीदारी संस्था, मुंबई (दूरध्वनीक्रमांक ०२२-२०८६१०१५, ई-मेलsupdt.mumbai@rof.maharashtra.gov.in) यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

०७. अंमलबजावणीः महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने (Maharashtra Information Technology Corporation Limited) आपले सरकार / मैत्री पोर्टलवर अर्ज, कागदपत्रे, शुल्क आणि शुल्क भरणा पध्दती, छाननीचे टप्पे आणि कालावधी या बाबी सदर शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे तंतोतंत संरचित कराव्यात. नागरिक आणि क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांच्या माहितीसाठी सदर शासन निर्णय, वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) व त्याची उत्तरे कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावीत.

आपले सरकार पोर्टल २.०/मैत्री पोर्टलवर शासकीय प्रक्रिया पुनर्रचना-२ (GPR-२) अंतर्गत प्रस्तावित बदलांची अंमलबजावणी झाल्यानंतर सदर शासन निर्णयातील सुधारीत प्रक्रिया व तरतूदी लागू होतील.

०९. राज्यातील भागीदारी संस्थेची नोंदणी या सेवेबाबत सद रशासन निर्णयाशी विसंगत असलेल्या यापूर्वीच्या सर्व सूचना, शासन आदेश, शासन निर्णय व परिपत्रके या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहेत.

सदर शासननिर्णय, महाराष्ट्रशासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६११२६१०२५३३६५१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJIT DEVIDAS BORKAR

Digitally signed by SUJIT DEVIDAS BORKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department, 2.5.4.20=5A2DA98647916B7E9855A22ECA1DDE333B089C86282054EEACBD978B2B81A017, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7704308B7FF87C4C3453297E5225CAF5D9849C4CFFB77ACCF2B2FE315202A47B, cn=SUJIT DEVIDAS BORKAR
Date: 2026.11.26 10:26:37 +05'30'

सोबत:- परिशिष्ट १, २ व ३

(सुजित बोरकर)
सहायक सॉलिसिटर नि उप सचिव,
महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा/ विधानपरिषद विधानमंडळ मुंबई
५. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
९. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई.
११. मा. राज्यमंत्री (विधि व न्याय विभाग) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
१२. मुख्य आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग, मुंबई
१३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई.
१६. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), विधानभवन, मुंबई,
१९. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), विधानभवन, मुंबई,
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई,
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२२. निबंधक, निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२३.सह सचिव / उप सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
२४. निवडनस्ती / समन्वंय.

Annexure I

Application Form - Generator Set Plan Approval

The application form shall be presented on the Rof/Maitri/Aaple Sarkar portal in the following sequence. A particular shown as filled by the system shall be drawn from the source stated against it and shall be displayed to the applicant for confirmation.

A. Registration of Partnership Firm's

	Fields Name	Mandatory/Non-mandatory	How it is filled
1	Firm Name (M/S.) *	Mandatory	Auto fetched using PAN Card number (Income Tax department). Also the said field will be editable.
2	Firm Name(in Marathi) *	Mandatory	An auto translation from English field and editable functionality is available.
3	Nature of Business *	Mandatory	As per section 58 (a)Applicant needs to submit the detailed nature of business. [Partners usually mention all the business they are intended to do, like Manufacturing of various products, trading in various products or serving in various field. So to identify the detailed nature of business it is necessary.]
4	Nature of Business (in Marathi) *	Mandatory	Auto translation from English field and editable functionality is available.
	Principal place of business of the firm	Mandatory	As per section 58 (b) it is necessary to mention the Place of Business in English Marathi translation will be auto fetched. Various Fileds in principal place of business like Building No, Building Name, Street Number,Street Name can be merged in single field i.e full address.
5	Full Address	Mandatory	Can be auto fetched from Pan Card of the firm.
6	Village/Town/City *	Mandatory	Applicant Need to fill it.
7	State *	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.
8	District *	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.
9	Taluka	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.
10	Pin Code *	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.
	Principal place of business of the firm (in Marathi)	Mandatory	
11	Full Address	Mandatory	Auto translate from English field also editable functionality is available.
12	Village/Town/City *	Mandatory	Auto translate from English field also editable functionality is available.
13	State *	Mandatory	Auto translate from English field also editable functionality is available.
14	District *	Mandatory	Auto translate from English field also editable functionality is available.

15	Taluka	Mandatory	Auto translate from English field also editable functionality is available.
16	Pin Code *	Mandatory	Auto translate from English field also editable functionality is available.
17	At Will	Mandatory	Applicant need to select as per the deed.
	Names/Address of any other places where the firm carries business in the above name	Mandatory	
18	Full Address	Mandatory	Applicant Need to fill it or if possible, can be auto fetched from Pan Card.
19	Village/Town/City *	Mandatory	Applicant need to select.
20	State *	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.
21	District *	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.
22	Taluka	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.
23	Pin Code *	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.
	Partner's Details	Mandatory	As per section 58 (e) it is necessary to mention the names and permanent addresses of partners. An amendment for requiring of Aadhaar card is proposed and also after discussion with team, it is possible that the relevant information will be auto fecthed from Aadhaar card along with editable functionality.
24	Is partner an individual	Mandatory	Selection box for Individual and Legal entity is available. In addition to that An Indian Citizen or NRI option can be provided.
25	First Name	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
26	Father/Husband Name	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
27	Surname	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
28	Company Name	Mandatory	If the partner is legal entity then the details can be auto fetched from ROC Department.
29	Date of Joining *	Mandatory	Auto fecthed from PAN along with editable functionality.
30	Country	Mandatory	NRI Partner's full address shall be filled in one single box.
31	Full Address		Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
32	Village/Town/City *	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
33	State *	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
34	District *	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.

35	Taluka	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
36	Pin Code *	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
37	Is Minor ? *	Mandatory	
38	Date on which He/She will attain majority	Mandatory	Auto fetched as per date of birth from Aadhaar card.
39	Guardian First Name	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
40	Guardian Father/Husband Name	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
41	Guardian Surname	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
42	Country	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
43	Full Address	Mandatory	Auto fecthed from Aadhaar card along with editable functionality for both Indian and NRI.
44	Village/Town/City *	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.
45	State *	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.
46	District *	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.
47	Taluka	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.
48	Pin Code *	Mandatory	State, District, Taluka selection will be done automatically on Pin Code basis.

Annexure II

Format of the Generator Set Plan Approval Certificate

FORM ' H ' / नमुना 'ह'

(See rule १७ / नियम१७पहा)

CERTIFICATE OF REGISTRATION
नोंदणीचे प्रमाणपत्र

THE INDIAN PARTNERSHIP ACT, 1932

(ACT NO. IX OF १९३२)

भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२

(सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९)

Registration No. _____

It is certified that a firm by name " _____ _____ __ " with its head office at _____ _____ _____, India has this day been duly registered under The Indian Partnership Act, 1932 (Act No. IX of 1932).

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते आहे की, _____ _____ _____,, India येथे मुख्यालय असलेल्या "_____ _____ ___ " या नावाच्या संस्थेची

२३ Nov, २०२६ या दिवशी भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ (सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९) अन्वये योग्य रीतीने नोंदणी करण्यात आली आहे.

Given under my hands this Date: _____

दिनांक _____ या दिवशी माझ्या सहीने देण्यात आले.

Assistant Registrar of Firms, Mumbai/…

Digitally signed by Officer Name _____| Date: _____Time: _____

ठिकाण: **नाव, पदनाम,**

दिनांक :सही

[SEAL OF OFFICE]

[BAR Code / QR Code]

Annexure III

Process Flow - Generator Set Plan Approval

The service shall follow the process flow set out below.

Step-1	The citizen signs in to the Rof/Aaple Sarkar / Maitri portal through the citizen profile and selects the Form 'A'.
Step-2	The applicant fills the application i.e. Form 'A' details required as per Annexure-I and attach the required documents. Then applicant submits the Application to department.
Step-3	The Desk-1 scrutinizes the application and the documents and verifies the documents attached if it is ok then forwards the application to Asstt/ Deyputy/ Registrar after scrutiny.
Step-4	The desk-2 approves the application if found in order and issues the certificate or reject the application for further correction or removal of objection.
Step-5	The certificate is delivered on the portal and the applicant is informed by SMS and e-mail.